# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

**दिनांक ०८.०७.२०२६ बुधवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०७.०७.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०८ केसेसमध्ये ०९ ईसमांवर कारवाई करून ९१,५३०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०४ केसमध्ये ०८ इसमावर कारवाई करुन ३८,७०७/— रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,५२६ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,५०,६५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा, युनिट क्र. ३ पथकाची कामगिरी :— जबरी चोरी करून जिवे मारणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक २८.०६.२०२६ चे ०३.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे लकडगंज हद्दीत, एनएचएस हॉस्पीटल, गंगाबाई घाट चौक, नागपुर येथे दोन अज्ञात व्यक्तींनी एका अनोळखी जखमी व्यक्तीस आणलेले आहे. अशा माहीतीवरून पोलीस ठाणे लकडगंज येथील बिटमार्शल यांनी जखमी यांना मेयो हॉस्पीटल येथे दाखल केले असता, उपचारादरम्यान १०.०० वा. चे डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले होते. पोलीस ठाणे लकडगंज येथे अकस्मात मृत्यु दाखल करण्यात आला होता.

अकस्मात मृत्युचे चौकशीत जखमी यांना हॉस्पीटल येथे आणनारे व्यक्तींचे बयानावरून अकस्मात मृत्युचे घटनास्थळ हे टेलीफोन एक्सचेंज चौक ते गंगाबाई घाट चौक उड्डाणपुलाखालील जय मारूती कार एक्ससेरीज समोर सिमेंट रोडवरील असल्याचे निष्पन्न झाले. मृतकाची ओळख पटवुन, त्याचे नांव हेमलाल राजेंद्र घृतलहरे, वय ३२ वर्षे, रा. रसोटा, तह. कोसमंदी, जि. बलोदा बाजार (छत्तीसगढ) असे असल्याचे निष्पन्न झाले. मृतक याचे नातेवाईकांचे बयान नोंदविले असता, मृतक हा आजमशहा चौक येथे सेंट्रींगचे मजुरीचे काम करीत व तेथेच राहत असल्याचे समजले. व तो घटने दिवशी मुळगांवी येणार होता परंतु, आला नसल्याचे सांगीतले.

गुन्हेशाखा युनिट क्र. ०३ चे अधिकारी व अंमलदार यांनी प्राप्त माहीतवरून, तांत्रीक तपास केला असता, घटनास्थळाजवळील सिसिटीव्ही फुटेजमध्ये एका चालत्या ऑटो रिक्षामधुन मृतक हा खाली सिमेंट रोडवर पडत असल्याचे दिसले. ऑटो चा शोध घेतला असता, ऑटो क्र. एम. एच. ४९ ए.आर ४४८६ असुन, त्याचे मालकाने घटनेदिवशी ऑटो हा आरोपी क्र. १) मोहम्मद आसिफ वल्द साजीद शेख, वय २३ वर्ष, रा. गरीब नवाज चौक, रजा मस्जीद जवळ, गल्ली नं. २, खरबी रिंग रोड, नागपुर यास किरायाने दिल्याचे सांगीतले. त्यास ताब्यात घेवुन अधिक विचारपुस केली असता, त्याने घटनेदिवशी त्याचे सोबत आरोपी क्र. २) प्रफुल्ल उर्फ पप्या

ताराचंद चौधरी, वय ३० वर्ष, रा. जानगांव कोमटी, तह. चिमुर, जि. चंद्रपुर ह.मु.– खरबी चौक, माऊली पान ठेल्याजवळ, वाठोडा, नागपुर ३) मोहम्मद आसिफ उर्फ मोनु उर्फ चावल वल्द मोहम्मद रशिद, वय २८ वर्ष, रा. अवलीया नगर, मोठा ताजबाग, सक्करदरा, नागपुर हे दोघे असल्याचे सांगीतले. आरोपींनी घटनेदिवशी ते रात्री ऑटोने फिरत असतांना, मृतक यास गंगाजमुना चौक ते आदमशहा चौक दरम्यान तो थैली घेवुन पायदळ जात असतांना त्यास जबरीने ऑटोत बसविल्याचे व त्याचे खिशातुन व बॅगमधुन रोख २,०००/–रू. काढुन घेतले. तो आरडा–ओरड करीत असतांना त्यास मारहाण केल्याचे व त्याचे जवळील बॅग फेकुन दिल्याचे सांगीतले. तसेच, तो बेशुध्द झाल्यावर त्यास ऑटोबाहेर घटनास्थळी फेकुन पळुन गेल्याची कबुली दिली.

आरोपी यांनी संगणमत करून, हेमलाल राजेंद्र घृतलहरे, वय ३२ वर्षे यास जबरीने ऑटोत बसवुन, त्याचे जवळील रोख रक्कम जबरीने हिसकावुन व त्यास मारहाण करून बेशुध्द केले व चालत्या ऑटोमधुन सिमेंट रोडवर फेकुन दिल्याने, हेमलाल याचा उपचारादरम्यान मृत्यु झाला. हेमलालचे मृत्युस आरोपींचे कृत्य कारणीभुत झाले. याप्रकरणी पोलीस ठाणे लकडगंज येथे अकस्मात मृत्युचे चौकशीअंती पोनि. गुन्हे श्री. मनोज चौधरी यांनी दिलेल्या तक्रारीवरून आरोपींविरूध्द कलम ३०९(२),३०९(४),३०९(६),१०५,३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपुर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. शिवप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (अती.कार्य. गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. अतुल मोहनकर, पोउपनि. मधुकर काठोके, सफौ. संतोषसिंह ठाकुर, पोहवा. विजय श्रीवास, मनोज नेवारे, अनुप तायवाडे, अजय पाटील, विनोद गायकवाड, पोअं. मनिष रामटेके, दिपक दासरवार, चंद्रशेखर डेकाटे, विवेक भोयर, रोहीत काळे, जितेश रेड्डी, सहदेव चिखले, दिपक लाकडे, विशाल रोकडे, प्रमोद देशभ्रतार, अनिल बोटरे व मंगेश मेश्राम यांनी केली.



**<u>३) कळमना पोलीसांची कामगिरी :– गांजा बाळगणाऱ्या आरोपींना अटक.</u>**

दिनांक ०८.०७.२०२६ चे ०२.१५ वा. ते ६.४० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे कळमना येथील बिटमार्शल यांनी पोलीस ठाणे हद्दीत सर्जा बार चौक ते चिखली चौककडे जाणाऱ्या रोडवर काली माता मंदीर जवळ एका ग्रे रंगाचे ॲक्टीवा क्र. एम.एच. ४९ बि.एस ६०२० चे चालकावर संशय आल्याने त्यास थांबवुन त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव रिंकु सुरेश राजपुत, वय ३० वर्ष, रा. मयुर नगर गार्डन समोर, गुरूतेग बहादुर नगर, कपीलनगर, नागपुर असे सांगीतले. त्याचे वाहनाचे पायदानवर ठेवलेल्या प्लास्टीक बोरीमध्ये अंमली पदार्थ असल्याचे संशयावरून, पंचासमक्ष झडती घेतली असता त्याचे ताब्यातील बोरीमध्ये हिरव्या रंगाचा

अंमली पदार्थ गांजा मिळुन आला. आरोपीस विचारपुस केली असता त्याने, नमुद गांजा त्याचा परिचीत गुरूप्रितसिंग, रा. यशोधरानगर, नागपुर याने त्याचे ट्रकने आणुन एच.बि. टावुन पुलीया कडुन चिखलीकडे जाणाऱ्या रोडचे बाजुला दिल्याचे व तो ट्रक घेवुन ऑटोमोटीव्ह चौककडे गेल्याचे सांगीतले. पोलीसांनी त्वरित सापळा रचुन ऑटोमोटीव्ह चौक ते कामठी कडे जाणाऱ्या रोडवर ट्रक क्र. ओडी ०५ एएक्स ६१४० ला थांबविले. त्याचा चालक व क्लीनर यांना नांव पत्ता विचारले असता, त्यांनी आपले नांव १) गुरूप्रितसिंग सुरजीत मुलतानी, वय ४३ वर्ष, रा. संजीवनी क्वॉर्टर नं. ४७/११, यशोधरानगर, नागपुर २) बाल्या सुभाष भडके, वय ४० वर्ष, रा. भंते आनंद कौशल्या नगर, पिवळी नदी, कपीलनगर, नागपुर असे सांगीतले. त्यांची विचारपुस केली असता, त्यांनी रिंकु राजपुर यांस गांजा दिल्याची कबुली दिली. पंचासमक्ष झडती घेतली असता ट्रकचे केबीनमध्ये एका प्लास्टीक बोरीमध्ये ६ कि. १२४ ग्रॅम गांजा मिळाला. आरोपीचे ताब्यातुन ॲक्टीवा वरील गांजा वजनी ४ कि. ३०८ ग्रॅम तसेच, ट्रकचे झडतीमध्ये केबीनमध्ये प्लास्टीक बोरीमध्ये ६ कि. १२४ ग्रॅम असा एकुण १०.४३२ कि.ग्रॅम गांजा, तिन मोबाईल फोन, ॲक्टीवा मोपेड व ट्रक असा एकुण ३३,४१,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा विक्री करण्याकरीता बाळगुन वाहतुक करतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२०(ब)(ii),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे कळमना येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपुर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमना विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. प्रविण काळे, पोउपनि. निवृत्ती फड, संतोषकुमार रामलोड, पोहवा. रविकुमार शाहु, पोअं. अनिल जाधव, देवेंद्र पंढरे, संतोष पांडे व अमित कोड्डुवार यांनी केली.

**<u>२) गुन्हेशाखा, युनिट क्र. ४ पथकाची कामगिरी :— जबरी चोरी करणाऱ्या आरोपींना त्वरीत अटक.</u>**

दिनांक ०७.०७.२०२६ चे १६.३० वा. ते १६.५० वा. चे दरम्यान, फिर्यादी रामदास सुखलाल गाडापेले, वय ४० वर्षे, रा. पवनसुत नगर, भैय्याजी डेहनकर यांचे घरी किरायाने, हुडकेश्वर, नागपुर हे त्यांचे मजुरी कामावरून पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत म्हाळगी नगर चौकातुन पिपळाकडे जाण्याकरीता एका ऑटो रिक्षात बसुन जात असतांना, ऑटोरिक्षा चालक व त्याचे सोबत असलेला एक ईसम यांनी संगणमत करून रिक्षा हुडकेश्वर रोड, क्वालीटी वाईनशॉप समोर थांबविली व, फिर्यादी यांना पैसे मागितले. फिर्यादी यांनी ऑटोचे भाडे देतो, असे म्हटलेवरून आरोपी ऑटोचालक व त्याचा साथीदार यांनी संगणमत करून, फिर्यादीस चाकुचा धाक दाखवुन, फिर्यादीचे खिशातील मोबाईल व त्याचे कव्हरमधील रोख ३,०००/—रू. व खिशातील ३००/—रू. असा एकुण ८,३००/—रू. चा मुद्देमाल जबरीने हिसकावुन, फिर्यादीस दगडाने डोक्यावर मारून जखमी करून ऑटोसह पळुन गेले. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे आरोपींविरूध्द कलम ३०९(६),३११,३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासात गुन्हेशाखा युनिट क्र. ०४ चे अधिकारी व अंमलदार यांनी त्वरीत दखल घेवुन, तांत्रीक तपास करून, आरोपींना निष्पन्न केले व सापळा रचुन आरोपी क्र. १) नितीन योगेशरावजी डेंगे, वय ३९ वर्षे, रा. साई नगर नं. २, साई मंदीर जवळ किरायाने, हुडकेश्वर, नागपुर २) बादल मारोतीराव ठाकरे, वय ३६ वर्ष, रा. इंगोले नगर, बोरकर हॉस्पीटल जवळ, हुडकेश्वर, नागपुर यांना ताब्यात घेवुन त्यांना विचारपूस केली असता, त्यांनी वर नमुद जबरी चोरीचा गुन्हा संगणमताने केल्याची कबुली दिली. आरोपींचे ताब्यातुन गुन्ह्यात

वापरलेला ऑटा रिक्षा, ०३ मोबाईल फोन व रोख ३००/—रू. असा एकुण ३,३५,३००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींना मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव हुडकेश्वर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपुर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. शिवप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (अती.कार्य. गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. बाबुराव राऊत, सपोनि. वैभव बारंगे, पोहवा. निलेश ढोणे, प्रकाश राजपल्लीवार, देवेंद्र नवघरे, पुरूषोत्तम काळमेघ, अजय यादव, अतुल चाटे, पुरूषोत्तम जगनाडे श्रीकांत मारवाडे यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे हिंगणा :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक २९.०६.२०२६ चे १३.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे हिंगणा हद्दीत, समृध्दी हायवे सर्व्हीस रोड, एक्झीगो लॉजीस्टीक पार्क गोडावुन समोर, मौजा वडगांव गुजर, हिंगणा, नागपुर येथुन फिर्यादीचे मोठे भाऊ पांडुरंग नामदेव डांगे, वय ७४ वर्षे, रा. हनुमान मंदीर, वडगांव गुजर, हिंगणा, जि. नागपुर हे पायदळ जात असता, कोणीतरी अज्ञात चारचाकी वाहनाचे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन पायी जाणाऱ्या फिर्यादीचे भावास धडक देवुन, पळुन गेला. त्यांना गंभीर जखमी अवस्थेत उपचाराकरीता एम्स हॉस्पीटल येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान दिनांक ०७.०७.२०२६ चे ०७.०५ वा. डॉक्टरांनी त्यांना मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी अर्जुन नामदेव डांगे, वय ५८ वर्ष, रा. जलंब, तह. शेगांव, जि. बुलडाणा यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हिंगणा येथे अज्ञात वाहन चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१),२८१ भा.न्या. सं., सहकलम १३४, १७७, १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे अजनी</u> :—** दिनांक ०७.०७.२०२६ चे १२.०० वा. चे सुमारास, फिर्यादीचे वडील नामे दिलीप दादाराव बेलेकर, वय ६३ वर्ष, रा. गल्ली नं. ५, भिमनगर, अजनी, नागपुर हे पोलीस ठाणे अजनी हद्दीत, प्लॉट नं. ४२, गल्ली नं. ७, जोगी नगर, येथे स्वप्नील चव्हाण यांचे घरी ईलेक्ट्रीक काम करीत असतांना त्यांना

अचानक ईलेक्ट्रीक करंट लागल्याने ते खाली पडुन बेशुध्द झाले. घरमालकांनी त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी अनिकेत दिलीप बेलेकर, वय २७ वर्ष यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे अजनी येथे सपोनि. आलुरे ७५०७९६३१५३ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**